# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०३/२०२४ (शनिवार) दुपार

---

### पोस्टे खापा हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दि. २९/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ हे अवैध्य धंदयावर रेड करणेकरीता पोस्टे खापा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन गोपनीय मिळालेल्या माहिती वरून **आरोपी नामे— जयभिम शेषराव बागडे, वय ४२ वर्ष रा. बिचवा** ता. सावनेर जि नागपुर हा आपली हिरो कंपनीची मोटारसायकल क्र. एम एच ४०/सी एन ६५४६ ने अवैधरीत्या विनापरवाना दारू घेवुन येतांना दिसल्याने त्यास थांबवुन त्याचे मोटरसायकलवरील चुंबडीमध्ये असलेल्या काळया रंगाच्या रबरी टयुबची पाहणी केली असता त्यामध्ये २५ लीटर गावठी मोहाफुल दारू किंमती १२५०/— रू. व हिरो कंपनीची मोटरसायकल क्र. एम एच—४०/सी एन ६५४६ किंमती ३०,०००/—रू. असा एकुण ३१,२५०/— रू चा मुद्देमाल अवैधरीत्या मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ६५ (e) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते, सहायक फौजदार नारायण बोरकर पोलीस अंमलदार राहुल रेवतकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर